**INTERMEDIATE**
**PART - II**

**Marathi Model Paper - II**

Time : 3 Hours **(Second Langauge)** Max. Marks : 100

---

**सूचना : सर्व प्रश्न आवश्यक आहेत.**

**विभाग - अ**

**प्रश्न 1. पुढीलपैकी एका कवितेची मध्यवर्ती कल्पना स्पष्ट करा.** **1 x 8 = 8**

1. आवाहन
2. खांब
3. अखंड

**प्रश्न 2. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर लिहा.** **1 x 6 = 6**

1. कवयत्रीने देवाला 'अजब गारोडी' असे का म्हटले आहे ?
2. स्त्रियांच्या जगण्याचे चित्रण कवयत्री शांता शेळके यांनी कसे केले आहे ?
3. सर्वांना सुखी करण्याबरोबरच स्वतः सुखी व्हायचे असेल तर काय केले पाहिजे असे महात्मा फुले यांनी सांगितले आहे ?

**प्रश्न 3. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर लिहा.** **1 x 6 = 6**

1. 'मुंबई म्हणजे साक्षात कल्पवृक्ष', असे का म्हटले आहे ?
2. प्रत्येक मोठ्या माणसाचा एक 'होयबा' असतो' पाठाच्या आधारे स्पष्ट करा.
3. उन्नीकृष्णनचे आभार आपण मानायला हवे, असे लेखकांना का वाटले ?

**प्रश्न 4. पुढीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे लिहा.** **2 x 4 = 8**

1. विनोदाचे फायदे कोणते ?
2. गुंडगुळ्याचा माळ हे ठिकाण भुतांच्या दृष्टीने गैरसोयीचे का होते ?
3. बँडच्या आवाजामुळे लेखकाच्या मनात कोणत्या शंका आल्या ?
4. नगप्या आणि त्याच्या दोस्ताची कोणती गोष्ट तुकारामाने पाहुण्यास सांगितली ?
5. उन्हाच्या तिरिपेची सवय व्हावी म्हणून रवीने कोणती कृती केली ?

**प्रश्न 5. पुढील पद्यांपैकी कोणत्याही दोनाचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** **2 x 4 = 8**

1. जीवशिव दोनी खुंटे गे प्रपंचाचे नेटें गे ।
   लावुनी पांचीं बोटें गे तूं येरे बा विठ्ठला

2. बीय टरारे भुईत, सर्वे कोंब आले वऱ्हे
   गह्यरलं शेत जसं, अंगावरती शहारे.

3. समरपुराचे वारकरी हो समरदेवता बोलविते
   रक्त आपुल्या प्रिय आईचें शुभ्र हिमावर ओघळते !

4. तिच्या अहेवचुड्याआड मनगट असते घट्ट
   'सारे मीच करीन !' तिचा जन्मताच हट्ट !

5. त्या आठीच्या रेघेवर पण, सही ठोकिली मम नशिबानें
   असा कसा मी मुकाच झालो; मुकी जाहलिस तूंहि कशानें ?

**प्रश्न 6. पुढील वाक्यांपैकी कोणत्याही दोनाचे संदर्भासह स्पष्टीकरण करा. 2 x 4 = 8**

1. 'नदनवन अशी परस्पर विरोधी असतात'
2. 'यंत्रमानव हा मूलतः सांगकाम्या आहे.'
3. 'हिरीच्या आईमुळं मी त्या घराला बांधली गेले.'
4. 'मुंबई म्हणजे साक्षात कल्पवृक्षच !'
5. 'क्षणभरातच सावरून त्यांनी हारा उंचावला...... एखादा लाख मोलाचा दागिना उचलावा तसा.'

**प्रश्न 7. पुढील दोन प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा. 2 x 3 = 6**

1. महात्मा फुलेंनी कोणती भिक्षा मागितली आहे ?
2. पानांनी देवाकडे कोणती प्रार्थना केली ?
3. 'आवाहन' ह्या कवितेत तत्कालीन परिस्थितीचे वर्णन कसे केले आहे ?
4. 'देहाचाच खांब करून अवघे घर तोलते' या ओळीचे स्पष्टीकरण करा.
5. 'छत्ररूपी हात' या प्रतिमेचे स्पष्टीकरण करा.

**प्रश्न 8. पुढील पैकी दोन प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा. 2 x 3 = 6**

1. लेखकाचे नंदनवन कोठे व कसे आहे ?
2. लेखिकेला हिराची आई का आवडली ?
3. यंत्रमानव हा सांगकाम्या आहे हे उदाहरण देऊन स्पष्ट करा.
4. लेखकांच्या घरी बाग फुलविण्यामागे उन्नीकृष्णनच्या कोणत्या भावना होत्या ?
5 फ्रामरोझचे आयुष्य कसे सार्थकी लागले ? स्पष्ट करा.

**प्रश्न 9. पुढील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. 1 x 4 = 4**

1. ओव्या केव्हा गायल्या जातात?
2. ज्योतीरावांच्या मते आपले आचरण कसे असावे ?
3. स्वातंत्र्याचे डंके कोठे झडले ?
4. लग्नात स्त्रीला काय आंदण मिळते ?

**प्रश्न 10. पुढील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.** **1 x 4 = 4**

1. बालपणी आपण कोणाला आदर्श मानतो ?
2. कोकणातल्या बाबल्याचे नंदनवन कोणते ?
3. शांतीसदन कोणी बांधले ?
4. आपले राष्ट्र ध्वनिप्रदूषण कसे करते ?

## विभाग - ब

**प्रश्न 11. पुढीलपैकी एका प्रश्नाचे उत्तर लिहा.** **1 x 5 = 5**

1. लेखांचे विविध प्रकार स्पष्ट करा.
2. सूत्रसंचालनाच्या संहितेची वैशिष्ट्ये थोडक्यात लिहा.
3. सामाजिक संपर्कासाठीच्या संकेतस्थानाचे फायदे सांगा.
4. अग्रलेख आणि बातमी यातील फरक स्पष्ट करा

**प्रश्न 12. पुढीलपैकी एका प्रश्नाचे उत्तर लिहा.** **1 x 5 = 5**

1. विकारी शब्द म्हणजे काय ? ते सांगून क्रियापदाची माहिती द्या.
2. वाक्प्रचार म्हणजे काय ते उदाहरणासहित सांगा.
3. विरामचिन्हे म्हणजे काय ? ते सांगून क्रियापदाची माहिती द्या.

**प्रश्न 13. (अ) पुढील शब्दांचे दोन समानार्थी शब्द लिहा.** **1 x 5 = 5**

1. काळोख – –
2. देव – –
3. मित्र – –
4. आनंद – –
5. नमस्कार – –

**(आ) गटात न बसणारा शब्द ओळखा** **1 x 5 = 5**

1. चित्र

   a) चमचा b) पेन्सिल c) रंग

2. शाळा

   a) शिक्षक b) वर्ग c) शिंपी

3. दिवा

   a) तेल b) वात c) चौरंग

4. बाग

a) फुले b) फलाट c) फळ

5. चहा

a) हळद b) दूध c) साखर

**प्रश्न 14. खालील प्रत्यय जोडून नवीन शब्द तयार करा.** **1 x 5 = 5**

1. अति 2. अधि 3. अनु

4 अभि 5. अव

**प्रश्न 15. पुढील शब्दांचे अर्थ सांगा.** **1 x 5 = 5**

1. सुविधा
2. हाकारणे
3. संजावणे
4. मुबलक
5. आहोटी

**प्रश्न 16. पुढीलपैकी एका विषयावर निबंध लिहा.** **1 x 6 = 6**

1. मी सूर्य बोलतोय
2. सर्कशीतला सिंह
3. माझी आई
4. पाण्याविना दशदिशा